2018-19

Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 162 ▪ Mar. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# WOMEN EMPOWERMENT

... Guest Editor ...

**Dr. Dinesh R. Jaronde**

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

M.G. Art's, Science & late N.P. Commerce College, W. Armori

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

21. **The Gallantry Feature of Vidarbhian Women Successfully Fought Against British Government in Quit India Movement: A Historical Perspective** ........ 48
Dr. Prashant R. Dhage

22. **Contribution of Women Playback Singers in The Field of Film Music From 1940'S-1960'S Era** ........ 50
Jaspreet Kaur Jassal

23. **Content Analysis on Women`s role in Politics in the context with Tamil Nadu** ........ 53
Saranya. P

24. **Human Rights and Women** ........ 57
Ku. Tai B. Uke

25. **Women and Leadership** ........ 59
Dr. Yashavanthi K,

26. **The Role of Music in Women Empowerment in India** ........ 61
Shallu Jasrotia

27. **Gender Equity And Women Power In India** ........ 63
Dr. S. S. Kawale

## मराठी

२८. **निर्मलग्राम पुरस्कार योजनेतील महिलांच्या सहभागामुळे त्यांच्यात झालेल्या बदलांचे अध्ययन** ........ ६६
प्रा. राजु दिवाकरराव भोंगाडे

२९. **यवतमाळ जिल्ह्यातील बंजारा समाजाच्या शेतमजुर स्त्रियांची सामाजिक–आर्थिक स्थितीचे अध्ययन** ........ ७०
प्रा. सुनिता अर्जुनराव राठोड

३०. **महिला सक्षमीकरण व कौटुंबिक हिसांचार** ........ ७३
डॉ. नारायण एम. वघाळे

३१. **भारतीय शास्त्रीय संगीताच्या विकासामध्ये महिलांची भूमिका (गायन, वादन व नृत्य)** ........ ७६
प्रा. शिवदास विठ्ठलराव शिंर्दे

३२. **विदर्भातील महिलांच्या शैक्षणिक विकासाचा भौगोलिक अभ्यास** ........ ७८
डॉ. मनिषा अमित गावंडे

३३. **महिला सबलीकरण : संकल्पना आणि भारतातील महिला सबलीकरणाविषयी धोरणात्मक दृष्टीकोण** ........
डॉ.गंगाधर रामराव भुक्तर

३४. **सिनेसंगीत आणि महिला** ........ ८३
रायबोले अर्चना रामरतन

३५. **असंघटीत महिला कामगार जाणिव जागृती...** ........ ८६
श्री. भारत चिंतामणी बंडगर

३६. **कौटुंबिक निर्णय प्रक्रियेत महिलांचे स्थान** ........ ९०
डॉ. ज्योती शेषराव दिघाडे

३७. **महिला सक्षमीकरण : कायदेविषयक साक्षरता** ........ ९३
डॉ. धर्मेन्द्र तेलगोटे

३८. **स्त्री विषयक अधिकारात फुले, शाहु, आंबेडकर यांचे योगदान** ........ ९६
प्रा. डॉ. विलास एम. डेहणकर

३९. **ग्रामीण महिला व सक्षमीकरण** ........ ९८
डॉ. मेघा सबाने

४०. **ताराबाई शिंदेचा स्त्रीवादी दृष्टिकोन व आजच्या स्त्रियांचे सक्षमीकरण** ........ १०१
प्रा. डॉ. ईश्वर सोमनाथे

४१. **भारतातील स्त्री सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची स्थिती एक मूल्यमापन** ........ १०५
प्रा. डॉ. गजेंद्र कढव

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
Impact Factor (SJIF) - 6.261 | Special Issue 162 : Women Empowerment
ISSN : 2348-7143
March 2019

# भारतातील स्त्री सक्षमीकरणाचे धोरण आणि महिलांची स्थिती एक मूल्यमापन

प्रा. डॉ. गजेंद्र कढव
समाजशास्त्र विभागप्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, जि. गडचिरोली-४४१२०८

कायदे, धोरण व कल्याणकारी कार्यक्रमाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क व दर्जा प्रदान करणे, त्यांच्या विकासासाठी सर्व संधी उपलब्ध करून देणे, पुरूष आणि महिलांमध्ये समानता निर्माण करणे तसेच महिलांना निर्णय प्रक्रियेत सक्षम बनविणे या प्रक्रियेला स्त्री सक्षमीकरण असे म्हणतात. मानवी समाजात महिलांचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. तरी सुद्धा महिलांचे सक्षमीकरण करण्याची वेळ येत आहे, यासारखा दैवदुर्विलास नाही.

महिलांच्या अवनतीचे, अधोगतीचे आणि मागास राहण्याचे प्रमुख कारण म्हणजे तिचे अज्ञान, निरक्षरता आणि अंधश्रद्धाळू प्रवृत्ती होय. स्वतःच्या अधिकारांची, हक्कांची आणि स्वातंत्र्याची तिला जाणीव नसल्याने ती अन्यायाच्या विरोधात प्रतिकार करू शकत नाही. परिणामी ती शारीरिक, मानसिक आणि आर्थिक शोषणाला सहजच बळी पडते.

मानवी हक्कांना अनेक वेळा आंतरराष्ट्रीय परिषदेत मान्यता मिळाल्यानंतरही स्त्रियांचे मागास, अज्ञानी आणि निरिक्षर राहण्याचे प्रमाण खुप मोठे आहे. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय अशा क्षेत्रात महिला पुरूषांच्या तुलनेत खुप मागे आहेत. ग्रामीण, आदिवासी काय शहरी समाजात सुद्धा महिला स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकत नाही. सर्वच निर्णयावर तिला पुरूषांवर अवलंबून राहावे लागते. जोपर्यंत महिला निर्णय प्रक्रियेत पूर्णपणे १०० टक्के सक्षम होत नाहीत, तोपर्यंत महिलांचे सक्षमीकरण होणार नाही.

महिला सक्षमीकरणाची संकल्पना सर्वप्रथम केनिया या देशातील नौरोबी येथील १९६५ च्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत मांडण्यात आली. त्यानंतर भारताने सुद्धा २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरणाचे वर्ष म्हणून जाहीर केले. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २००१ या वर्षात शासनाच्या माध्यमातून, सामाजिक संघटनेच्या माध्यमातून देशभरात महिलांच्या सक्षमीकरणावर अनेक ठिकाणी व्याख्यान, चर्चासत्र, कार्यशाळा, शिबीर घेण्यात आले. २००१ च्या सक्षमीकरणाच्या वर्षामध्ये पुढील घटकांवर भर देण्यात आला.

१) राजकीय, प्रशासकीय आणि व्यवस्थापनामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे.
२) महिलांचे दरडोई उत्पन्न वाढवून त्यांना आर्थिक स्वावलंबी बनविणे.
३) महिलांना मोफत शिक्षण देणे, नवनवीन क्षेत्रामध्ये त्यांना रोजगाराच्या सोयी उपलब्ध करून देणे.
४) महिलांचे अधिकार आणि हक्क यांच्या विषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे.
५) २००१ मध्ये हिंदू विवाह कायदा (दुरूस्ती) अधिनियम, भारतीय वारसा (दुरूस्ती) अधिनियम पारित करण्यात आले.
६) महिला सक्षमीकरणासाठी काम करणाऱ्या व्यक्तींना, संघटनांना शासनाद्वारे पुरस्कार व बक्षिस देऊन सन्मानित करण्यात आले.

वरील सर्व तरतुदी २००१ च्या महिला सक्षमीकरणाच्या वर्षी करण्यात आल्या. या तरतुदींमुळे पुर्वीपेक्षा स्त्रियांच्या दर्जात खुम मोठ्या प्रमाणात सुधारणा घडून आली. आज सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, शैक्षणिक आणि राजकीय अशा सर्वच क्षेत्रात महिलांचे स्थान आणि भुमिका महत्वाची आहे.

**सामाजिक क्षेत्रात महिलांची स्थिती :**

पुर्वीपेक्षा आज महिलांच्या सामाजिक स्थितीमध्ये खुप मोठ्या प्रमाणात सुधारणा झाल्याचे दिसून येते. पुर्वी महिला घराच्या बाहेर तर सोडाच पण खिडकी, दरवाजातून वाकून सुद्धा पाहू शकत नव्हत्या. पण आज मात्र ती घराबाहेर पडून समाजातील मोठमोठी पदे भुषवित आहे. असा कोणताही क्षेत्र उरलेला नाही की जिथे महिला सहभागी होऊ शकत नाही.

आज बहुतांश महिलांनी जुन्या परंपरागत विचारांना तिलांजली देऊन नवीन तर्कसंगत मूल्यांचा स्वीकार करताना ती दिसत आहे. तसेच आज चार भिंतीचे तिचे जीवन राहिलेले दिसत नाही.

**आर्थिक क्षेत्रात महिलांची स्थिती :**

स्वातंत्र्यपूर्व काळात महिला आर्थिक दृष्टीकोनातून पाहिल्यास पुर्णपणे पुरूषांवर अवलंबून असायच्या. महिला घराच्या चार भिंतीच्या आत राहून 'चुल आणि मुल' सांभाळायच्या आणि पुरूषांनी आर्थिक कामे करावी, असे समीकरण पुर्वी भारतीय समाजव्यवस्थेत होते. परंतु आज मात्र महिला आत्मनिर्भर आणि स्वावलंबी बनत आहे. ती आज पुर्णपणे पुरूषांवर अवलंबून नाही. आज महिला प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, अभियंती, पोलीस अधिकारी, उद्योगपती अशा विविध क्षेत्रातील पदे प्राप्त करून पुरूषांएवढेच अर्थोत्पादन करीत आहे.

म्हणजेच आज महिलांची पुर्वीप्रमाणे आर्थिक कुचंबना होत नाही. तर त्या आर्थिक दृष्ट्या आत्मनिर्भर बनत आहे.

**राजकीय क्षेत्रात महिलांची स्थिती :**

पुर्वी महिलांना निवडणूक तर सोडाच मतदानाचा सुद्धा अधिकार नव्हता. पण आज मात्र महिलांना मतदानाचा, निवडणूक लढविण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. आज राजकारणामध्ये सरपंचापासून तर राष्ट्रपती पर्यंतची सर्वच पदे प्रामाणिकपणे ती भुषवित आहे. म्हण जेच आज राजकीय क्षेत्रात सुद्धा महिलांचा सहभाग वाढत आहे.

Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli